आज़ादी का अमृत महोत्सव

2021-22

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- XLIX, Feb. 2022




## कल अर्थसंकल्पाचा
## Budget Trend

Editor
**Dr. Rajesh G. Umbarkar**

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Address for Correspondence
*Mrs. Pallavi Laxman Shete*
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
*Dr. Rajesh G. Umbarkar*
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

**(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)**

SHIVAJI COLLEGE HINGOLI



# INDEX



| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | ANALYSIS OF GENDER BUDGETING OF INDIA | Vitthal Haribhau Nagare<br>Dr. G. R. Khedkar | 01 |
| 02. | POLICY OF CRYPTO CURRENCY IN BUDGET 2022 | Dr. Anurath M. Chandre | 06 |
| 03. | BUDGET FROM THE PERSPECTIVE OF SUSTAINABLE DEVELOPMENT | Dr. Shakuntala Patil | 13 |
| 04. | BUDGET, MEANING, CONCEPT, HISTORY AND REQUIREMENTS | Patil Vitthal Anandrao | 16 |
| 05. | GOVERNMENT EXPENDITURE ON AGRICULTURE SECTORS AND FARMERS WELFARE WITH REFERENCE TO UNION BUDGET OF INDIA | Dr. G. B. Darade | 19 |
| 06 | भारतीय अर्थसंकल्पाचा इतिहास | प्रा. डॉ. अजय प्रभाकर कुंट | 31 |
| 07. | केंद्रीय अर्थसंकल्पनाचा अर्थ व आवश्यकता | प्रा. जयश्री मच्छिंद्र बगाटे | 34 |
| 08. | केंद्रीय अर्थसंकल्प २०२२ अपेक्षा व वास्तव | डॉ. बबन आमले | 39 |
| 09. | बजेट मध्ये कृषीक्षेत्रात केलेल्या तरतुदी काळानूसार होत गेलेले बदल आणि अपेक्षा | सौ.पाऊलबुध्दे अनुराधा रामभाऊ<br>प्रा. डॉ. अशोक कोरडे | 43 |
| 10. | "अर्थसंकल्प संकल्पना व सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक एक दृष्टीक्षेप" | प्रा. डॉ. मोहन बळीबा शिंदे | 47 |
| 11. | बजेट मध्ये आरोग्यक्षेत्रात केलेल्या तरतुदी काळानुसार होत गेलेले बदल आणि अपेक्षा | देशमुख नितीन उल्हास<br>डॉ. अशोक कोरडे | 53 |
| 12. | केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23 आणि कृषिक्षेत्र | प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे | 57 |
| 13. | 2022 च्या अर्थसंकल्पातील शाश्वत विकासाचे स्थान | श्री. योगेश खंडेराव पाटील<br>डॉ. गोविंदराव शंकरराव कांबळे | 62 |
| 14. | केंद्रीय अर्थसंकल्प (२०२२-२०२३) -चाकूच्या धारधार किनाऱ्यावरून चालणारा... | चंद्रकांत भूपाल पाटील | 65 |
| 15. | "डिजिटल चलन" | प्रा. संजीवनी प्रशांत घरत | 73 |
| 16. | कौटुंबिक बजेट आराखडयात महिलांची प्रमुख भुमिका | सौ भारती बेदिल माने | 77 |
| 17. | केंद्रीय अर्थसंकल्प /बजेट मध्ये बँकिंग क्षेत्रात केलेल्या तरतुदी, काळानुसार झालेले बदलआणि अपेक्षा (2009-10 ते 2022-23) | प्रा. अमोल देविदास दिवटे | 80 |
| 18. | राज्याचा अर्थसंकल्प २०२२-२३ | डॉ. राजेश गं. उंबरकर | 84 |





Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

137

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23 आणि कृषिक्षेत्र

**प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना-**

भारतीय अर्थव्यवस्था स्वातंत्र्य काळापासून स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण होत असले आणि विकासाच्या 12 पंचवार्षिक योजना पूर्ण होत असल्या तरीही जागतिक स्तरावर कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणूनच ओळखले जाते. भारतातील एकूण जवळपास 70 टक्के लोकसंख्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे.62 टक्के ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन कृषी आहे. भारतात सर्वात जास्त रोजगार निर्मिती ही कृषी क्षेत्रातून होत असते. उद्योग क्षेत्राला कच्चामाल यांचा पुरवठा करणारे क्षेत्र म्हणून कृषिक्षेत्र ओळखले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. एकूणच अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. परंतु भारतीय कृषी क्षेत्राचा स्वातंत्र्य काळात औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या तुलनेत विकास मात्र अल्प स्वरूपाचा झाल्याचा दिसून येतो.

**संशोधनाची आवश्यकता-**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अनन्य महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्य काळात इतर क्षेत्राच्या बरोबरच कृषी क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आलेला आहे. विशेषतः दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पासून भारतातील कृषी क्षेत्राला औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या तुलनेत कमी महत्त्व देण्यात आल्याचे दिसून येते. दरवर्षी होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये कृषी क्षेत्राचा उल्लेख केला जातो.परंतु कृषी क्षेत्राच्या विकासासाठी योजना व निधीचा तुलनेने अल्प पुरवठा दिसून येतो. केंद्रीय अर्थमंत्री माननिय निर्मला सीतारमण यांनी नुकताच लोकसभेमध्ये सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23 यामध्ये भारतीय कृषी क्षेत्र संदर्भात काय उल्लेखनीय योजना नव्याने निर्माण करण्यात आलेल्या आहेत?कृषी क्षेत्राच्या आधुनिकीकरणावर भर देण्यात आलेला आहे काय? आणि कृषी क्षेत्राच्या एकूण विकासाला चालना देण्यासाठी किती प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे?या व या संबंधित इतर घटकांचा आढावा घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत लघु संशोधन करण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन विषयासंदर्भातील दैनिक वृत्तपत्रे, वेबसाईट, युट्युब, टीव्ही चॅनल्स, साप्ताहिक यामधून लेखना संदर्भातील माहिती उपलब्ध करण्यात आली व त्या आधारे प्रस्तुत लघु संशोधन पूर्ण करण्यात आले.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1) केंद्रीय अर्थसंकल्प2022-23 मध्ये कृषी क्षेत्राच्या विकासासाठी ज्या विविध उपाय योजनावर भर देण्यात आले आहे याचा आढावा घेणे.
2) विशेषतः कृषी विषयक नव्याने योजना निर्माण केल्या आहेत त्याचे विश्लेषण करणे.
3) भारतीय कृषिक्षेत्रा संदर्भात सरकारकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्षात प्राप्त झालेले लाभ याचा आढावा घेणे.
4) अर्थसंकल्पामध्ये पूर्ववत चालू असलेल्या योजना,कार्यक्रम व नव्याने निर्माण करण्यात आलेले योजना,कार्यक्रम आधुनिक तंत्र यांच्या यश-अपयश व वास्तव स्थिती संदर्भात अभ्यास करणे.

**विषय विवेचन-**

भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23 लोकसभेत सादर केला. त्यामध्ये अपेक्षेप्रमाणे अर्थव्यवस्थेतील प्राथमिक,द्वितीय आणि तृतीय क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याचे यापूर्वी चालू असलेल्या योजना पूर्ववत चालू ठेवून त्यामध्ये काही नवीन योजनांची घोषणा करून या माध्यमाने प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येते. भारतीय कृषी क्षेत्रामध्ये कृषी कायद्याच्या मदतीने अमुलाग्र बदल करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला होता परंतु भारतीय शेतकऱ्यांनी या कायद्याला विरोध करण्यासाठी दिल्लीत वर्षभर आंदोलन केले. आणि या वर्षभर चाललेल्या शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला बऱ्याच काही अपेक्षा आणि आकांक्षा निर्माण झाल्या होत्या.

केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी विविध उपाययोजना वर देण्यात आला आहे. यामध्ये महत्त्वाच्या योजना म्हणजे किसान ड्रोनला प्रोत्साहन,रसायनमुक्त नैसर्गिक शेती, झिरो बजेट शेती तसेच शेतकऱ्यांना डिजिटल सेवा अंतर्गत जमिनीच्या दस्तऐवजांचे डिजिटलायझेशन करणे, शेतकऱ्यांना डिजिटल व उच्च तंत्रज्ञानाने युक्त ही सेवा आणि इतर सेवा पुरवण्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून कृषी मूल्य साखळी उभारणार उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. ड्रोन च्या माध्यमाने पिकांचे संरक्षण करणे कीटकनाशकांची फवारणी करणे पिक पाहणी करणे त्याचबरोबर जमिनीचे मोजमाप करणे शक्य होईल या उद्देशाने शेतकऱ्यांना ड्रोन पुरवण्याचे व दोन लाख परवानगी देण्याचे या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आले आहे. रसायनमुक्त शेतीसाठी या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. कृषी क्षेत्रात पिकांच्या उत्पादन वाढीसाठी कीटकनाशके, रासायनिक खते यांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येत आहे. यामुळे जमिनीचा कस कमी होतो त्याचबरोबर रोगराईचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचा निष्कर्ष समोर आला याला अनुसरून रसायनमुक्त शेती हा संकल्प करण्यात आला आहे. आणि या संकल्पनेचे सुरुवात पहिल्या टप्प्यात गंगेच्या काठावर पाच किलोमीटर परिसरात हा प्रयोग केला जाईल असे जाहीर केले आहे. त्याचबरोबर सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी पदवी व पदव्युत्तरअभ्यासक्रमांचा आढावा घेण्यासाठी कृषी विद्यापीठ व राज्यांना प्रोत्साहन दिले



Assistant Professor
Shivaji College Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

138A

जाणार आहे.

दिवसेंदिवस खाद्यतेलाच्या वाढत्या किमतीवर नियंत्रण आणण्यासाठी तेलबियांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात येणार आहे. खाद्यतेल आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी एक विशेष योजना राबवली जाणार असून देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. आणखी एक आश्वासक कल्पना अंदाजपत्रकात आहे ती म्हणजे 2023 हे वर्ष बाजरी उत्पादन वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले आहे. तसेच नागली नाचणी बाजरी ज्वारी अशा भरड धान्य यांना प्रस्थान दिले जाईल आणि याचा लाभ अतिशय गरीब शेतकरी यांना होईल. याचा उद्देश म्हणजे वरील भरडधान्याच्या उत्पादनाचा वापर वाढवा यासाठी सरकार मदत करेल असे अर्थमंत्र्यांनी नमूद केले आहे.पर्यावरणाचा असमतोल कमी करण्यासाठी आणि वेळी अवेळी होणारा पाऊस आणि त्यामुळे होणारे शेती क्षेत्रांची नुकसान नियंत्रणात राहण्यासाठी कृषी वनीकरण तसेच खाजगी वनीकरण आला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार धोरण राबवणार आहे असे या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले. नॅशनल मिशन फोर ग्रीन इंडिया यासाठी गेल्या वर्षी असलेल्या 290 कोटी रुपयांच्या तरतुदीत भरीव वाढ करून सरकारने यंदा ती 261.69 कोटी रुपये केली आहे. एकट्या राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाला 300 कोटी रुपये देण्यात आले आहे.गेल्या वर्षी ही रक्कम 235 कोटी रुपये होती.'[1] कृषिक्षेत्रामध्ये वेळोवेळी येणारे नैसर्गिक संकटे व बाजारातील उत्पादनाच्या किमती संदर्भातील होणारा चढ उतार यातून होणारे नुकसान लक्षात घेऊन त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी 'शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून 2.37 लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या थेट खात्यांमध्ये जमा करण्यात आले असल्याचे अर्थमंत्री यांनी स्पष्ट केले आहे.'[2] कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कृषी क्षेत्रातील स्टाटर यांना ही प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादनाला किमान आधारभूत किंमत एमपीएस मिळावी अशी अपेक्षा भारतीय शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती याला अनुसरून अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले की,'2021-22 सालचा रब्बी आणि खरीप पाच या हंगामात अनुक्रमे गहू आणि तांदळाचे 12 कोटी टनाची खरेदी होईल आणि त्याचा फायदा दीड कोटी शेतकऱ्यांना होईल यासाठी सरकार दोन लाख 37 हजार कोटी रुपये खर्च करेल.'[3] शेतकऱ्यांच्या उत्पादनाला किमान आधारभूत किंमत देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पातून झाल्याचे दिसून येतो. शेतकऱ्यांचे कृषी क्षेत्रातील उत्पादन वाहतूक करण्यासाठी एक उत्पादन एक रेल्वे स्टेशन ही योजना देखील शेतकऱ्यांच्या मालवाहतूकी साठी राबवण्यात येणार आहे. झिरो बजेट शेती च्या आधारे शेतकऱ्याच्या एकूण उत्पादन खर्चामध्ये घट करून त्यांच्या उत्पादनामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे दिसून येते.

**केंद्रीय अर्थसंकल्पातील विषयी घोषणा आणि वास्तव स्थिती-**

भारतीय कृषी क्षेत्राचा विकास पर्यायाने भारतीय शेतकऱ्यांनी चा विकास करण्याच्या उद्देशाने केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये कृषी क्षेत्र संदर्भातील नवीन योजना जाहीर करण्यात आल्या आहेत की, ज्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होईल. परंतु या योजना आणि त्यांचे यश हे वास्तव स्थितीच्या काही प्रमाणात दूर असल्याचे दिसून येते. जसे की,'भारतामध्ये एक ते दोन ट्रॅक्टर शेती असणारे सीमांत शेतकरी यांचे प्रमाण अधिक आहे.ज्यामध्ये एक हेक्टर



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

138 B

जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 68 टक्के आहे. तर दोन हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 18 ते 20 टक्के आहे.[4] अशा स्थितीमध्ये किसान ड्रोन योजना शेतकऱ्यांना कशा पद्धतीने उपयुक्त व लाभाचे असेल हा प्रश्न निर्माण होतो. किमान आधारभूत किंमत हे फक्त दोन पिकासंदर्भात उल्लेख केला आहे त्यामध्ये गहू आणि तांदूळ परंतु सरकारने एमपीएस 22 पिकांसाठी जाहीर केली आहे. आणि केवळ दोन पिकांची खरेदी करते हे वास्तव चित्रण समोर या अर्थसंकल्पात येत आहे. आणि मग उर्वरित पिकांच्या खरेदीचे काय हा प्रश्न समोर उभा टाकतो. 'कृषी संदर्भात राबवण्यात येणारी मनरेगा या योजनेसाठी गेल्या वर्षी 98 हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती परंतु सन 2022-23 साठी मात्र 73 हजार कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत याचा अर्थ 25 हजार कोटी रुपये या ठिकाणी कमी करण्यात आले आहेत.'[5] अशा वास्तू स्थितीमध्ये भारतीय कृषी क्षेत्राचा विकास व आधुनिकीकरण कशा पद्धतीने होईल हे वास्तव ते पासून दूर असल्याचे दिसते.

**संशोधनाचे निष्कर्ष-**

1) केंद्रीय अर्थसंकल्पात किसान ड्रोन, रसायनमुक्त नैसर्गिक शेती, झिरो बजेट शेती अशा अशा नवीन योजनांची घोषणा करण्यात आली आहे.
2) भारतीय शेतकऱ्यांना डिजिटल व उच्च तंत्रज्ञानाने युक्त अशा सोयी पुरवण्याची घोषणा करून कृषी मूल्य साखळी उभारण्यात येणार आहे हे जाहीर केले.
3) पर्यावरण समतोल निर्माण करून कृषी क्षेत्रात येणाऱ्या नैसर्गिक संकटे टाळण्यावर भर देण्यात आला आहे.
4) कृषी क्षेत्रातील संशोधनाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.
5) झिरो बजेट शेती कशा पद्धतीने अस्तित्वात येईल याचे विश्लेषण करण्यात आले नाही.
6) भरड धान्य नागली,नाचणी,बाजरी,ज्वारी अशा मालाचे उत्पादन करून खरेदी हमी भावाने करणार काय? याचा उल्लेख करण्यात आलेला नाही.
7) रासायनिक राधाने आणि कीटकनाशके यांच्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करू शकतोय काय हा प्रश्न या अर्थसंकल्पातून समोर येतोय.
8) अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यांना किसान ड्रोन तंत्रज्ञान वापरणे परवडण्यासारखे नाही त्यामुळे या योजनेमध्ये या अल्पभूधारक शेतकऱ्यांना कशा पद्धतीने समाविष्ट करून घेतले जाईल याचे विश्लेषण करण्यात आले नाही.

**सारांश-**

केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23 यामध्ये अर्थमंत्री निर्मला सिताराम यांनी केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये कृषी क्षेत्राच्या आधुनिकतेवर भर देण्याचा प्रयत्न केला आहे. रासायनिक खते,कीटकनाशके यावर शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात होणारा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने झिरो बजेट शेतीची संकल्पना आणि रसायन मुक्त शेती, सेंद्रिय शेतीचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. हमे भावांच्या उल्लेख पिकांची खरेदी संदर्भात केला परंतु केवळ गहू



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)
158 c

आणि तांदूळ या दोनच पिकांचा उल्लेख केला उर्वरित पिकांच्या संदर्भात उल्लेख करण्यात आलेला नाही तमा इतर पिकांची खरेदी हमे बहवा प्रमाणे सरकारकडून होईल किंवा नाही हा प्रश्न याठिकाणी निर्माण होतो. झिरो बजेट शेती मध्ये शेतकऱ्यांचे उत्पादन वाढेल काय? किसान ड्रोन योजना छोट्या शेतकऱ्यांना परवडेल काय? अशा अनेक प्रश्नांचे निर्मिती या अर्थसंकल्प चा अभ्यास करत असताना होते. भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण असलेल्या कृषी क्षेत्राला अपेक्षित प्रमाणात या अर्थसंकल्पामध्ये लाभ प्राप्त होत असल्याचे दिसून येते नाही. किती निधी उपलब्ध करून दिलेला आहे याचा उल्लेख नाही अनेक अपेक्षा या ठिकाणी व्यक्त केल्या होत्या परंतु त्या अपेक्षा पूर्ण होत असताना दिसून येत नाही.असे असले तरीही पण कृषी क्षेत्राच्या विविध योजनांवर भर देण्यात आल्याचा दिसून येतो.

## संदर्भसूची


1) दैनिक लोकसत्ता, दिनांक 01 फेब्रुवारी 2022 पृष्ठ क्रमांक 07
2) कित्ता पृष्ठ क्रमांक 06
3) कित्ता
4) http:s//ABPmajha youtube.com
5) पूर्वोक्त संदर्भ क्रमांक 2
6) https://mr.vikaspedia.in
7) https://mr.m.wikipedia.in
8) दैनिक महाराष्ट्र टाइम्स
9) नवभारत टाइम्स
10) दैनिक लोकमत


Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



138 D